**फार्मसी कौंसिल ऑफ इंडिया, नवी दिल्ली यांच्या मान्यतेस अनुसरून, शैक्षणिक वर्ष २०२५-२६ पासून विद्यमान औषधनिर्माणशास्त्र अभ्यासक्रमाच्या संस्थेत नवीन पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रम सुरु करणे/ पदव्युत्तर पदवी/ पदवी अभ्यासक्रमाच्या प्रवेशक्षमतेत वाढ करणे यासाठी शासन मान्यता देण्याबाबत.**

**चन्नबसवेश्वर फार्मसी कॉलेज, बसवेश्वर चौक, लातूर**

महाराष्ट्र शासन

**उच्च व तंत्रशिक्षण विभाग**

**शासन निर्णय क्र.मान्यता-२०२५/प्र.क्र.७०८/तांशि-४**

मादाम कामा रोड, हुतात्मा चौक राजगुरु चौक,
मंत्रालय विस्तार भवन, मुंबई-४०० ०३२.

**दिनांक: ०६ ऑक्टोंबर, २०२५.**

**संदर्भ** : संचालक, तंत्र शिक्षण यांचे पत्र क्र.२/एनजीसी/पीसीआय-मान्यता/२२५३, दि.३०.०९.२०२५.

**प्रस्तावना** : फार्मसी कौंसिल ऑफ इंडिया, नवी दिल्ली यांनी दिलेल्या मान्यतेस अनुसरुन, विद्यमान औषधनिर्माणशास्त्र अभ्यासक्रमाच्या संस्थेत शैक्षणिक वर्ष २०२५-२६ पासून नवीन पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रम सुरु करणे/ पदव्युत्तर पदवी/ पदवी अभ्यासक्रमाच्या प्रवेशक्षमतेत वाढ करणे यासाठी शासन मान्यता देण्याबाबतचा प्रस्ताव संचालक, तंत्र शिक्षण यांनी संदर्भाधीन पत्रान्वये शासनास सादर केला आहे. त्यानुषंगाने मान्यता देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय** : फार्मसी कौंसिल ऑफ इंडिया, नवी दिल्ली यांनी दिलेल्या मान्यतेस अनुसरुन व संचालक, तंत्र शिक्षण यांच्या प्रस्तावानुसार, **चन्नबसवेश्वर फार्मसी कॉलेज, बसवेश्वर चौक, लातूर** या विद्यमान औषधनिर्माणशास्त्र अभ्यासक्रमाच्या संस्थेत सोबतच्या **"प्रपत्रामध्ये"** दर्शविल्याप्रमाणे, शैक्षणिक वर्ष २०२५-२६ पासून नवीन पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रम सुरु करणे/ पदव्युत्तर पदवी/ पदवी अभ्यासक्रमाच्या प्रवेशक्षमतेत वाढ करणे यासाठी खालील अटी व शर्तींच्या अधीन राहून शासनाची मान्यता देण्यात येत आहे.

**अटी व शर्ती:-**

१) सदर मान्यता ही कायम विनाअनुदान तत्वावर राहील.

२) प्रस्तुत बाबतीत फार्मसी कौंसिल ऑफ इंडिया, नवी दिल्ली यांनी विहित केलेल्या तसेच दि.२१ मे, १९८३ च्या शासन निर्णयान्वये विहित केलेल्या अटींची पूर्तता करणे संबंधित संस्थेस बंधनकारक राहील.

३) शासनाने विहित केलेल्या, तसेच, फार्मसी कॉन्सिल ऑफ इंडिया, नवी दिल्ली यांनी विहित केलेल्या सर्व अटी व शर्ती मान्य असल्याबाबत संस्थेस, संचालक, तंत्र शिक्षण यांच्यासोबत करारनामा करावा लागेल. तसेच, आवश्यक कागदपत्रांची आणि औपचारिक बाबींची पूर्तता संचालक, तंत्र शिक्षण, महाराष्ट्र राज्य यांच्या संमतीने समाधानकारकरित्या करण्यात येईल.

४) संबंधित संस्थेने संचालक, तंत्र शिक्षण यांचेकडे आवश्यक ती संचित ठेव संयुक्त खात्यात भरुन इतर कायदेशीर बाबींची पूर्तता करावी.

५) सदर अभ्यासक्रमांचे प्रवेश शासनाने मान्य केलेल्या संबंधित अभ्यासक्रमाच्या प्रवेश नियमानुसार / पद्धतीनुसार करण्यात येतील.

६) शुल्क नियामक प्राधिकरणाने विहित केलेल्या शिक्षण शुल्कापेक्षा जास्त शुल्क संबंधित संस्थांनी आकारल्यास, त्या संस्थांवर महाराष्ट्र एज्युकेशनल इन्स्टिट्यूशन (प्रोहिबिशन ऑफ कॅपिटेशन फी) ॲक्ट, १९८७ अनुसार कारवाई करण्यात येईल.

७) संस्थेने अभ्यासक्रम चालविण्यास शिक्षक, शिक्षकेतर व इतर तांत्रिक कर्मचारी, फार्मसी कौंसिल ऑफ इंडिया, नवी दिल्ली यांच्या निकषाप्रमाणे नियुक्त करावेत. त्यांना नियमानुसार वेतन व भत्ते देण्यात यावेत. वेतन व भत्ते इ. बाबत शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांकडून तसेच, संस्थेविरुध्द विद्यार्थ्यांकडून शासनाकडे तक्रारी आल्यास संस्थेवर कडक कारवाई करण्यात येईल.

८) संस्थेने आवश्यक ती पुस्तके, नियतकालिके फार्मसी कौंसिल ऑफ इंडियाच्या मानकानुसार खरेदी करणे आवश्यक आहे. तसेच, विद्यार्थ्यांना वाचनालयाचा पुरेपूर उपयोग होण्याच्या दृष्टीने ग्रंथालयात विद्यार्थ्यांना अभ्यासिकेची सोय करणे आवश्यक आहे. तसेच, फार्मसी कौंसिल ऑफ इंडियाच्या मानकाप्रमाणे सर्व शैक्षणिक सोयीसुविधा (उदा. प्रयोगशाळा, वाचनालय, वर्गखोल्या इ.) करणे आवश्यक आहे.

९) रॅगिंग संदर्भात मा.सर्वोच्च न्यायालयाचे निर्देश व महाराष्ट्र प्रोहिबिशन ऑफ रॅगिंग ॲक्ट, १९९९ यांची कठोरपणे अंमलबजावणी करणे आवश्यक राहील.

१०) शासन निर्णय, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, दि.२२.०२.२०१८ अन्वये विहित केलेले नोंदणी शुल्क संबंधित महाविद्यालय / संस्थेने भरणा केले नसेल, तर ते संबंधित सहसंचालक, तंत्र शिक्षण विभागीय कार्यालय यांनी संबंधित महाविद्यालय / संस्थेकडून भरणा करुन घ्यावे.

११) महाविद्यालयाने / संस्थेने सदर अभ्यासक्रमाकरीता, संबंधित विद्यापिठाचे संलग्नीकरण प्राप्त करुन घेणे आवश्यक राहील.

२. याशिवाय संचालक, तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई व संबंधित विद्यापीठ यांनी घालून दिलेल्या अन्य अटी व शर्ती संस्थेवर बंधनकारक राहतील.

३. या शासन मान्यतेनुसार उक्त संस्था / महाविद्यालयातील अभ्यासक्रमांचा केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेमध्ये समावेश होण्याकरिता संचालक, तंत्र शिक्षण यांनी आवश्यक ते आदेश निर्गमित करावेत.

४. हा शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यात आला असून त्याचा संकेतांक २०२५१००६१२५९४९४५०८ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

AJAY VITTHAL KHARDE

Digitally signed by AJAY VITTHAL KHARDE
DN: CN = AJAY VITTHAL KHARDE, C = IN, S = Maharashtra, O = GOVERNMENT OF MAHARASHTRA, OU = HTED
Date: 2025.10.06 13:01:34 +05'30'

**(अजय वि. खर्डे)**
**कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन**

**प्रत:-**

१) मा.मंत्री, उच्च व तंत्र शिक्षण यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
२) संचालक, तंत्र शिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई
३) संबंधित सहसंचालक, तंत्र शिक्षण विभागीय कार्यालय, (संचालक, तंत्र शिक्षण यांच्यामार्फत).
४) कुलसचिव, संबंधित विद्यापीठ (संचालक, तंत्र शिक्षण यांच्यामार्फत)
५) संबंधित महाविद्यालय / संस्था (संचालक, तंत्र शिक्षण यांच्यामार्फत)
६) निवडनस्ती (तांशि-४)

प्रपत्र

Higher and Technical Education Dept. G.R.No.Manyata-2025/C.R.708/TE-4, Dated : 06 October, 2025

List of Increase in Intake , New Course in existing Unaided Pharmacy Institute, Approved by PCI for A.Y. 2025-26

| Sr.No. | DTE CODE | PCI CODE | INSTITUTE NAME | STATUS | PROGRAMME | UNIVERSITY NAME | LEVEL OF COURSE | MAIN COURSE NAME | COURSE NAME | Course Status | INTAKE APPROVED . for 2024-25 | INTAKE APPROVED for 2025-26 | VARIATION | REMARKS |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2253 | PCI- 324 | Channabasweshwar Pharmacy College Basweshwar Chowk Kava Road Latur, Latur 413 512 | Un-Aided | PHARMACY | Swami Ramanand Teerth Marathwada University Nanded | POST GRADUATE | M. Pharmacy | Pharmacology | Unaided | 9 | 15 | 6 | Increase in Intake |
| | | | | | PHARMACY | Swami Ramanand Teerth Marathwada University Nanded | POST GRADUATE | M. Pharmacy | Regulatory Affairs | Unaided | 0 | 15 | 15 | New Course |
| | | | | | PHARMACY | Swami Ramanand Teerth Marathwada University Nanded | POST GRADUATE | Pharm D | Pharm D(PB) | Unaided | 0 | 10 | 10 | New Course |

AJAY VITTHAL KHARDE

Digitally signed by AJAY VITTHAL KHARDE
DN: CN = AJAY VITTHAL KHARDE, C = IN, S = Maharashtra, O = GOVERNMENT OF MAHARASHTRA, OU = HTED
Date: 2025.10.06 13:01:44 +05'30'

॥ या विद्या या विमुक्तये ॥
स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड
'ज्ञानतीर्थ', विष्णुपुरी, नांदेड – ४३१ ६०६ (महाराष्ट्र राज्य) भारत
SWAMI RAMANAND TEERTH MARATHWADA UNIVERSITY, NANDED
'Dnyanteerth', Vishnupuri, Nanded - 431 606 (Maharashtra State) INDIA
Established on 17th September, 1994, Recognized By the UGC U/s 2(f) and 12(B), NAAC Re-accredited with 'B++' grade
आज़ादी का अमृत महोत्सव
Phone: (02462) 215242 (Ext. - 152)
Fax:(02462) 215572
ACADEMIC (AFFILIATION) SECTION
Website: srtmun.ac.in
email: affiliation@srtmun.ac.in

जा.क्र. शैक्षणिक/संलग्न–०३/लातूर–१४७/२०२५–२६/788 दिनांक :– १६/१०/२०२५

प्रति,
मा. प्राचार्य
चन्नबस्वेश्वर फार्मसी कॉलेज (डिग्री) लातूर
ता. जि. लातूर

विषय :– आपल्या महाविद्यालयातील Pharm D (PB) , M. Pharmacy Regulatory Affairs या नवीन पदव्युत्तर अभ्यासक्रमास तसेच M.Pharm. Pharmacology या पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या प्रवेश क्षमतेत वाढ करुन संलग्नीकरण प्रदान करणे बाबत.

संदर्भ :– १. फार्मसी कॉन्सील ऑफ इंडिया, नवी दिल्ली यांचे Decision Letter. Date: 25th Septembar. 2025
२. महाराष्ट्र शासन उच्च व तंत्रशिक्षण विभाग शासन निर्णय क्र.मान्यता–२०२५/ प्र.क्र. ७०८/तांशि–४ मंत्रालय विस्तार भवन मुंबई–३२ दि. ०६/१०/२०२५
३. शैक्षणिक/संलग्न–०३/लातूर–१४७/२०२५–२६/७७० दिनांक. ०८/१०/२०२५

महोदय,

उपरोक्त विषयी आपणास कळविण्यात येते की, संदर्भीय पत्र क्र. ०१ फार्मसी कॉन्सील ऑफ इंडिया, नवी दिल्ली, यांनी आपल्या चनबस्वेश्वर फार्मसी कॉलेज (डिग्री) लातूर या महाविद्यालयात Pharm D (PB) , M. Pharmacy Regulatory Affairs या नवीन पदव्युत्तर अभ्यासक्रमास तसेच M.Pharm. Pharmacology या पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या प्रवेश क्षमतेत वाढ करणेसाठी कायम विनाअनुदान तत्वावर सुरु करण्यास मान्यता प्रदान केलेली आहे. संदर्भीय पत्र क्र. ०२ अन्वये महाराष्ट्र शासन उच्च व तंत्रशिक्षण विभाग शासन निर्णय क्र. मान्यता–२०२५/प्र.क्र.७०८/तांशि–४ मंत्रालय विस्तार भवन मुंबई–३२, दि. ०६/१०/२०२५ अन्वये Pharm D (PB) , M. Pharmacy Regulatory Affairs या नवीन पदव्युत्तर अभ्यासक्रमास तसेच M.Pharm. Pharmacology या पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या प्रवेश क्षमतेत वाढ करणेबाबत कायम विनाअनुदान तत्वावर सुरु करण्यास शैक्षणिक वर्ष २०२५–२६ पासून मान्यता प्रदान केलेली आहे.

आपल्या उपरोक्त महाविद्यालयातील Pharm D (PB) , M. Pharmacy Regulatory Affairs या नवीन पदव्युत्तर अभ्यासक्रमास तसेच M.Pharm. Pharmacology या पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या प्रवेश क्षमतेत वाढ करुन संलग्नीकरण प्रदान करणे संदर्भात पत्र क्र. ०३ अन्वये पाहणी समिती महाराष्ट्र सार्वजनीक विद्यापीठ अधिनियम, २०१६ कलम ११० नुसार गठीत करण्यात आली होती.

सदर समितीने प्रत्यक्ष पाहणी करुन सदरील महाविद्यालयातील Pharm D (PB) , M. Pharmacy Regulatory Affairs या नवीन पदव्युत्तर अभ्यासक्रमास तसेच M.Pharm. Pharmacology या पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या

प्रवेश क्षमतेत वाढ करणेबाबत खालील अटींच्या पुर्ततेच्या अधीन राहून तात्पुरते संलग्नीकरण देण्यात यावे अशी शिफारस केलेली आहे.

०१. विद्यापीठ मान्यताप्राप्त पुर्णवेळ प्राचार्य नियुक्त करणे.

०२. Regulatory Affairs संबंधी Software खरेदी करणे.

पहाणी समितीचा अहवाल मा. कुलगुरु महोदयांनी मा. विद्यापरिषदेच्या वतीने स्विकारुन पहाणी समितीच्या शिफारसीप्रमाणे आपल्या महाविद्यालयातील Pharm D (PB) या नवीन पदव्युत्तर अभ्यासक्रमास १० विद्यार्थी प्रवेश क्षमतेसह तसेच M. Pharmacy Regulatory Affairs या नवीन पदव्युत्तर अभ्यासक्रमास १५ विद्यार्थी प्रवेश क्षमतेसह तसेच M.Pharm. Pharmacology या पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या प्रवेश क्षमतेत वाढ (१५ विद्यार्थी प्रवेश क्षमता) करणेबाबत शैक्षणिक वर्ष २०२५–२६ पासून तात्पुरते संलग्नीकरणास मान्यता दिलेली आहे. त्यानुसार Pharm D (PB) , M. Pharmacy Regulatory Affairs या नवीन पदव्युत्तर अभ्यासक्रमास तसेच M.Pharm. Pharmacology या पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या प्रवेश क्षमतेत वाढ करणेबाबत शैक्षणिक वर्ष २०२५–२६ करिता तात्पुरते संलग्नीकरण देण्यात येत आहे.

उपरोक्त अभ्यासक्रम आपल्या महाविद्यालयात सुरु करण्यासाठी महाविद्यालयात कायम अर्हताप्राप्त प्राचार्य, शिक्षक व ग्रंथपाल यांची विद्यापीठ निवड समिती मार्फत निवड करुन आतापर्यंत किती पदे भरलेली आहेत तसेच भरती करण्यात आलेल्या शिक्षकेत्तर कर्मचारी यांचीही माहिती सहा महिण्याच्या आत सादर करावी. तसेच Regulatory Affairs संबंधी Software खरेदी करून त्वरीत अहवाल सादर करावा.

आपल्या वरील महाविद्यालयातील उपरोक्त नवीन अभ्याक्रमास फार्मसी कॉन्सील ऑफ इंडिया, उच्च व तंत्रशिक्षण विभाग, महाराष्ट्र शासन, विद्यापीठ अनुदान आयोग व विद्यापीठांनी वेळोवेळी निर्गमीत केलेल्या नियमांचे पालन करणे महाविद्यालयास बंधनकारक राहील.

आपला,

उपकुलसचिव,
शैक्षणिक (संलग्निकरण) विभाग

<u>प्रत महिती तथा योग्य त्या कार्यवाहीस्तव:</u>

०१. मा. सचिव, पी.सी.आय. नवी दिल्ली.

०२. मा. अव्वर सचिव, उच्च व तंत्रशिक्षण विभाग, मंत्रालय विस्तार भवन,मुंबई–४०००३२.

०३. मा. संचालक, शिक्षण संचालनालय, उच्च शिक्षण, ४१२ ई, बहिरट पाटील चौक, मॉडल कॉलनी, शिवाजीनगर, पुणे–४११ ०१६.

०४. मा. सहसंचालक, तंत्र शिक्षण, विभागीय कार्यालय, छत्रपती संभाजीनगर.

०५. संचालक, परीक्षा व मुल्यमापन मंडळ, प्रस्तुत विद्यापीठ.

०६. संचालक, क्रिडा शारीरीक शिक्षण मंडळ, प्रस्तुत विद्यापीठ.

०७. संचालक, विद्यार्थी विकास मंडळ, प्रस्तुत विद्यापीठ.

०८. संचालक, राष्ट्रीय सेवा योजना मंडळ, प्रस्तुत विद्यापीठ

०९. उपकुलसचिव, शैक्षणिक (मान्यता) विभाग, प्रस्तुत विद्यापीठ

१०. उपकुलसचिव, परीक्षा (पात्रता) व मुल्यमापन मंडळ, प्रस्तुत विद्यापीठ. (लातूर जिल्हयाकरीता)

११. सहा. कुलसचिव, अभ्यासमंडळ, प्रस्तुत विद्यापीठ.

१२. सहा. कुलसचिव, विशेषकक्ष, प्रस्तुत विद्यापीठ.

१३. सिस्टीम एक्सपर्ट, परीक्षा (संगणक) व मुल्यमापन मंडळ, प्रस्तुत विद्यापीठ (लातूर जिल्हयाकरीता)

Pendrive :New Affiliation Commttee2022-23